स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 05–11–2014** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |
| 8. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 11. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 12. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 13. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 14. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 15. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 16. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 214</u> :– प्रभाग क्र.38–अ, अंतर्गत गरोबा मैदान, कब्रस्थान भागात सिमेंट कॉक्रिटचे रस्ते बांधकामास्तव रू. 37,46,438/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 215</u> :– प्रभाग क्र. 47 – अ गणेश नगर, जुना नंदनवन, महाविर नगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रू. 31,65,880/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 216</u> :— प्रभाग क्र. 46 — ब धन्वंतरी नगर, चिटणीस नगर येथील रस्त्यांच्या डांबरीकरणाचे कामास्तव रू. 37,03,902/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 217</u> :— प्रभाग क्र. 63 — ब न्यु सुभेदार, उदयनगर, अयोध्यानगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रू. 47,73,126/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 218</u> :— प्रभाग क्र. 13 — अ पंचशील नगर व हाऊसिंग बोर्ड कॉलोनी येथे रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त 3 निविदापैकी मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 4.00 प्रतिशतने अधिक दराची रू. 51,85,534/— (रूपये एकावन्न लक्ष पंच्याशी हजार पाचशे चौतीस फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 219</u> :— प्रभाग क्र.41 ब, गाडीखाना, खिरुलाल वाडी हॉरीजॉन कॉन्व्हेट व ढोबळी गल्ली येथे सिमेंट कॉक्रीट रोड तयार करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 49,96,219/— ( अक्षरी एकोणपन्नास लक्ष शहाण्णव हजार दोनशे एकोणवीस रुपये ) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र.681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 220</u> :— प्रभाग क्र. 61 — अ महात्मा फुले, नरहरी, साई सेवाश्रम गृह निर्माण संस्था, रामकृष्ण नगर (ब) सेनापती नगर येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रू. 25,79,745/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे व पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 221</u> :— प्रभाग क्र. 15 — ब अंतर्गत विविध ठिकाणी खांब लावून प्रकाश व्यवस्था करणे व कळमना घाट चौक येथे 12.5 मी. हायमास्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता रु. 40,55,150/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा तसेच या कामास आवश्यक आर्थीक तरतूद मुक्त करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 222</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरिता एकुण 3 पर्यवेक्षक व 79 सुरक्षा रक्षक ( माजी सैनिक) कार्यरत असुन कंत्राटाची मुदत संपुष्टात आली आहे. पुढील कालावधी करीता दिनांक 15.06.2015 पर्यंत शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांना कंत्राटाची मुदतवाढ मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विषय कार्यालयास परत करण्यांस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 223</u> :— नागपूर महानगरपालिकेचे सन 2013—14 चे वार्षिक लेखे स्थायी समिती समोर माहिती करीता ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 224</u> :— म.न.पा. संचालित पेंशन नगर उर्दु माध्यमिक शाळा (अनुदानित), अहबाब को.ऑप. हाऊसिंग सोसायटी, पेंशननगर यांचे मालकीच्या भाडयाच्या इमारतीत असून दहा खाल्यांच्या भाडयापोटी म.न.पा. दरमहा रु. 3815/— एवढे भाडे अदा करित आहे. कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, नागपूर यांचे कार्यालयामार्फत सदर शाळेचे भाडे पुनर्निधारण होऊन प्राप्त 'भाडे प्रमाणपत्र' (क्र. 2959/दि. 29.04.2014) चे अनुषंगाने वाढीव रु. 10885/— दरमहा या दराने भाडे निश्चित करणे तसेच वाढीव दराने दि. 01.04.2013 पासुन संस्थेला भुगतान करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 225</u> :— प्रभाग क्र. 55 — ब, अंतर्गत लक्ष्मीनगर, सुरेन्द्र नगर, बजाज नगर पर्यंत रोडचे डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 49,65,062/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व आर्थिक वर्षात पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 226</u> :— प्रभाग क्र. 68 — अ, अंतर्गत संताजी सोसायटी, मेंगरे ले आउट, विजयानंद सोसायटी, डोबीनगर, संताजी सोसायटी, बालपांडे लेआउट येथे डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 48,45,508/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 227</u> :— जन्म —मृत्यू विभागा अंतर्गत जन्म—मृत्यू दाखल्याकरीता वापरण्यात येणाऱ्या कागदाकरीता दिनांक 28.08.2014 Commercial Prize Bid उघडण्यात आली, त्यातील चार निविदाकारांच्या तूलनेत M/s. P and G Sales Corporation, Napgur यांनी त्यांच्या निविदेत नमुद केलेले दर Rs. 7.95/- हे निम्नतम ( L1) आहेत. सर्व अटी व शर्तीप्रमाणे M/s. P and G Sales Corporation, Napgur यांची निविदा स्विकारण्यास हरकत नाही.

तसेच M/s. P and G Sales Corporation, Napgur यांचे मार्फत कुठल्या कारण्यास्तव संबंधित कागद पूरवठा करणे शक्य झाले नाही तर पर्यायी व्यवस्था म्हणून L2 — ठरत असलेले M/s. Sudarshan Paper Converting Works यांचे मार्फत ( L1 ने मंजूर केलेल्या रू. 7.95/— दरात व गुणवत्तेवर ) संबंधीत कागद पुरवठा पुढील एक वर्षाकरीता करण्याच्या अनुषंगाने दोन्ही निविदाकारांचे ना हरकत/संमतीपत्र प्राप्त झालेले आहे. सदर बाबीकरीता मान्यता प्राप्त झाल्यास पुढील प्रक्रिया करण्यात येईल.

म.न.पा.चे दहा झोन व मुख्यालय स्तरावर जन्म—मृत्यू दाखल्याकरीता महिन्याला अंदाजे 35000 कागदे व वर्षाला अंदाजे (35000 X 12 =) 4,20,000 कागदे वापरण्यात येतात. त्या अनुषंगाने निम्नतम निविदा दर Rs. 7.95/- (प्रती कागद) प्रमाणे येणारा वार्षीक खर्च अंदाजे (4,20,000 X 7.95 =) 33,39,000/— (अक्षरी रू. तेहत्तीस लाख एकोणचाळीस हजार फक्त) चा खर्च पद क्र. A20100120214 प्रिंटेड स्टेशनरी या पद शिर्षा अंतर्गत करण्याच्या मान्यतेकरीता प्रश्न समितीने

विचारात घेऊन 3 वर्षाकरिता दर करार करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 228</u> :– मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>–: ठराव :–</u>

भांडेवाडी येथे घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु करण्यात आला होता परंतू हा प्रकल्प सुरळीत रित्या सध्याच्या परिस्थितीत सुरु नाही असे कळले आहे.

हा प्रकल्प सुरु नसल्यामुळे तेथील नागरिकांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकल्प पुन्हा सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. तांत्रिक दृष्टया हा प्रकल्प अधिक सक्षम व्हावा या दृष्टीकोणातून या प्रकल्पाचे विस्तृत अहवाल विभागाने तयार करावा. याकरिता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लगार व या प्रकल्पाचे तांत्रिक वाणिज्यीक क्षमता तपासणाऱ्या सल्लागाराची नियुक्ती करुन, मगच रितसर निविदा काढाव्या अशी ही स्थायी समिती प्रशासनास निर्देश देते व प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार व या प्रकल्पाचे तांत्रिक वाणिज्यीक क्षमता तपासणाऱ्या सल्लागाराची नियुक्ती करण्यास व त्यासाठी निविदा काढण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

सुचक – हस्ता/– श्री. हरीष दिकोंडवार

अनुमोदक – हस्ता/– श्री. सागर लोखंडे

हस्ता/– सौ. सविता मनोज सांगोळे

<u>ठराव क्रमांक 229</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर